ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ — पुणे, बुधवार, ४ ऑगस्ट, १९७१ — अंक १५


## ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते !



पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. **एव्हरफ्रेश** (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.

Madison/HSW/4 Mar

**दि हिंदुस्थान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स लि.**, १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१

# एका थोर सहकारी कार्यकर्त्याचे शोचनीय निधन

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे एक निष्ठावंत कार्यकर्ते श्री. नारायण विनायक पांडव यांचे शुक्रवार दिनांक २३ जुलै १९७१ रोजी अल्प आजारानंतर शोचनीय निधन पुणे येथे झाले. जिल्हा सहकारी बँकेत, पदवी परीक्षा पास झाल्यानंतर केवळ सरकारी नोकरी करावयाची नाही या निश्चयाने सहकारी बँकेत साधे कारकून म्हणून त्यांनी अगदी लहान पगारावर नोकरी पतकरली. पुढे शाखाप्रमुख म्हणून ग्रामीण भागात काम केल्यावर ते पुणे कचेरीत व्यवस्थापक या उच्चपदावरून निवृत्त झाले.

## समाधानी जीवन

पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेतील मोठ्या कामाचा बोजा यशस्वी तऱ्हेने पेलून त्यांनी कॉसमॉस को. बँकेचे संचालक म्हणून व पुढे सल्लागार मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम केले. कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांचे संचालकत्वाखाली ग्वाल्हेर संस्थानाचे सहकारी अधिकारी यांच्यासाठी सन१९२९साली पुणे येथे शिक्षण-वर्ग चालविला होता. त्या अधिकारी मंडळींना बँकिंग विषयावर ते व्याख्याने देत. जिल्हा बँकेतून निवृत्त झाल्यावर ते काही काळ भोर स्टेट बँक लि. (ती पुढे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली.) ते व्यवस्थापक म्हणून होते. जिल्हा बँकेचे निवडणुकीस उभे राहून ते बँकेचे अध्यक्ष म्हणूनही निवडून आले. सर्व मंडळींशी प्रेमाने वागून स्वतःकडून जे जे करणे शक्य असे ते ते त्यांनी केले व त्यामुळे त्यांचे जीवन समाधानी होते.

## खिलाडू वृत्ती

ते स्वतः क्रिकेटप्रेमी होते. कॉलेजमध्ये असताना स्वतः ते चांगले क्रिकेट खेळत व त्या खेळाबद्दल त्यांना आत्मीयता वाटत असे. खिलाडू वृत्तीमधील दिलदारपणा त्यांच्या वागण्यात सतत दिसत असे. सहकारी बँकेतून निवृत्त झाल्यावर त्यांचा त्यांच्या मित्रमंडळाकडून जाहीर सत्कार कै. मामासाहेब दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. अशा प्रकारचा सत्कार निदान नोकरांच्या बाबत क्वचितच होत असेल. कै. पांडव यांचा मित्र-वर्ग बराच मोठा आहे. त्यांच्या शोचनीय निधनामुळे त्यांचे कुटुंबीयांचेवर दुःख कोसळले आहे. त्याचप्रमाणे त्यांचे सहकारी व मित्र यांच्यावरही दुःख कोसळले आहे. पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळींशी निकट संबंध असलेल्या एका निष्ठावंत व ध्येयवादी कार्यकर्त्यास सहकारी चळवळ मुकली आहे. कै. पांडव यांचे आत्म्यास परमेश्वर चिरशांती देवो, अशी दयाघन परमेश्वरास प्रार्थना आहे.

य. द. खोले

## चित्रपटांच्या आयातीची दुसरी बाजू

भारत सरकारने परदेशी चित्रपटांची आयात करण्याचे काम स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत करण्याचे ठरविले आहे. उलटपक्षी हिंदी चित्रपट परदेशी निर्यात करण्याचे प्रयत्न मात्र फारसे जोराने करण्यात येत नाहीत. अमेरिकन कंपन्यांनी भारतात आपले चित्रपट आणण्यासाठी ५० वर्षांपूर्वीपासून कचेऱ्या उघडलेल्या आहेत. त्या वेळी भारतात सिनेगृहांची संख्या फारच थोडी होती. आज भारतात ४,५५४ कायम स्वरूपाची चित्रगृहे आहेत. त्यांपैकी ९६ गृहांतून फक्त परदेशी चित्रपटच दाखविले जातात. कायम स्वरूपाच्या चित्रगृहांखेरीज देशात ३,५८७ फिरती अगर प्रवासी चित्रगृहे आहेत. पण त्यांतील कोणतीच चित्रगृहे केवळ परदेशी बोलपट दाखवीत नाहीत. फक्त परदेशी चित्रपट दाखविणाऱ्या ९६ सिनेगृहांपैकी ५८ चित्रगृहे दक्षिण भारतात आहेत आणि बाकीची ३८ देशाच्या इतर भागांत पसरलेली आहेत. त्यातही मुंबई, कलकत्ता आणि नवी दिल्ली ह्या मोठ्या शहरांतून त्यांची गर्दी झालेली आहे. अमेरिकेत परदेशी चित्रपट आयात करण्यावर बंधने नाहीत. चित्रपटांना सेन्सॉरच्या जाचातूनही जावे लागत नाही. फक्त प्रत्येकी १०० फूट चित्रपटावर ९६ अमेरिकन सेंटस् आयात कर द्यावा लागतो.

## पर्शिअन भाषेतील महाभारत

काश्मीर सरकारच्या संशोधन व ग्रंथालय खात्याने महाभारताची एक जुनी हस्तलिखित प्रत मिळविली आहे. महाभारताचा पर्शिअन भाषेत करण्यात आलेला-हा तर्जुमा काव्यबद्ध नाही. हे भाषांतर पं. बिरबल कौल नावाच्या एका विद्वानाने केलेले असून त्याचा रचनाकाल १८५४ ते १८५६ हा आहे. पं. कौल हे संस्कृत व पर्शिअन पंडित होते. महाभारताच्या प्रत्येक भाषांतरित पर्वाच्या प्रारंभी एक चित्र काढण्यात आलेले आहे. चित्रात त्या पर्वातील वर्ण्यविषय प्रामुख्याने दाखविलेला आहे. त्याशिवाय ह्या पर्शिअन भाषांतरात आणखी ४२ चित्रे आहेत. हा नवा ग्रंथ संस्कृत व अरेबिअन जुन्या ग्रंथांच्या वाचनालयात दाखल करण्यात आला आहे.

## कस्तुरी मृगांना अभयस्थान

उत्तर प्रदेश सरकारने कस्तुरी देणाऱ्या मृगांसाठी एक अभयस्थान सुरू करण्याचे ठरविले आहे. राणीखेतजवळ ह्या जातीच्या हरणासाठी उद्यान स्थापन करण्यात येणार आहे. आयुर्वेद पद्धतीने उपचार करणाऱ्या वैद्यांना कस्तुरीचे फार महत्त्व वाटते. कस्तुरीसाठी ह्या मृगांची हत्या करण्यात येते. त्यामुळे अत्यंत बुजऱ्या भित्र्या अशा ह्या प्राण्यांची संख्या अतिशय कमी झाली आहे. देशी वैद्यकांच्या मध्यवर्ती संशोधन संस्थेचे चालक डॉ. कुरूप ह्यांना अभयस्थानात मृगांची नैसर्गिक रीत्या वाढ होऊ शकेल असे वाटते. शिवाय त्यांची हत्या न करताही त्यांच्या बेंबीतील कस्तुरी काढून घेता येईल, असे डॉ. कुरूप ह्यांना वाटते.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ ऑगस्ट, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची दोन वर्षे

### उपेक्षित भागाकडे अद्याप पुरेसे लक्ष नाही

"राष्ट्रीयीकृत बँकांकडील ठेवी आणि त्यांनी दिलेली कर्जे ह्यात वाढ झाली असली तरी आजपर्यंत उपेक्षित असलेल्या विभागांचे बाबतीत बँकांनी केलेली प्रगती माझ्या अपेक्षेप्रमाणे झालेली नाही," अशी कबुली अर्थमंत्र्यांनी लोकसभेत दिली. क्रांतिकारक धोरणे आखण्यात आली आहेत आणि ती स्वीकारण्यातही आली आहेत, परंतु त्यांना आवश्यक दृष्टिकोनाची आणि कार्यपद्धतीची माणसे अद्याप तयार झालेली नाहीत असे त्यांनी सांगितले. आजपर्यंत कर्मचाऱ्यांचे शिक्षण व्यापार-उद्योगधंद्यांना अनुसरूनच होते. लीड बँक योजनेच्या अमलबजावणीस महत्त्वाचे स्थान आहे. श्री. चव्हाण हे स्वतः कित्येक राज्यांत दौरा काढून ह्याबाबत पाहणी आणि मार्गदर्शन करणार आहेत. प्रत्येक विभागाचे प्रश्न वेगवेगळे असल्याने सबंध देशासाठी एकच योजना आखता येणार नाही; प्रत्येक बँकेने स्वतःपुरती आखावी लागेल.

पब्लिक सेक्टरमधील बँकांच्या (स्टेट बँक आणि तिच्या उप बँका धरून) ठेवीत गेल्या दोन वर्षांत १,३६२ कोटी रुपयांची भर पडली. पण, स्टेट बँकेच्या गटांतील बँकांकडील ठेवीतच जास्त प्रमाणात वाढ झालेली आढळते. मुख्य प्रश्न ठेवी किती वाढल्या हा नसून बँकांचे राष्ट्रीयीकरण ज्या उद्देशाने केले तो उद्देश सफळ करण्यास त्या पुऱ्या पडतात किंवा नाही, हा आहे. ह्या निकषावर ताडून पाहता, ठेवींची वाढ आणखी व्हावयास हवी होती. ठेवीतील वाढीच्या मानाने कर्जवाटप अधिक होऊ शकले ह्याचे कारण रिझर्व्ह बँकेकडून मिळणारा मुबलक रिफायनान्स, हे होय."

अग्रस्थान देण्यात येणारे विभाग म्हणजे शेती, लघुउद्योग, निर्यात, इत्यादी. ह्यांना कर्जपुरवठा पहिल्या वर्षी जेवढा वाढला तेवढा दुसऱ्या वर्षी वाढला नाही. जादा कर्जपुरवठ्यात अग्रस्थान विभागाला पहिल्या वर्षी ५६ % वाटा मिळाला, दुसऱ्या वर्षी तो ३९.६% वर उतरला. आर्थिक परिस्थिती सुधारली म्हणजे पूर्वीच्या कर्जदारांना अधिक कर्जे लागतील आणि ती देता आली नाहीत तर उत्पादन खुंटेल. तेव्हा उपेक्षित विभागाला कर्जपुरवठा वाढावयाचा असेल तर ठेवीत भरभक्कम वाढ होणेच आवश्यक आहे.

---

## एअर इंडिया काही युरोपीय शहरे सोडणार

आंतरराष्ट्रीय वाहतूक करणाऱ्या एअर इंडिया कॉर्पोरेशनने युरोपमधील काही शहरे आपल्या थांबण्याच्या ठिकाणांतून कमी करण्याचे ठरविले आहे. ह्या शहरांत प्राग, झ्यूरीच आणि आम्स्टरडॅम ह्यांचा समावेश आहे. मुंबई-लंडन-न्यूयॉर्क ह्या मार्गावर वाहतूक करणारी कॉर्पोरेशनची विमाने जाताना व परत येताना ह्या शहरांत उतरत असत. परंतु पुरेसे प्रवासी मिळत नसल्यामुळे तसे करणे बंद करावे लागत आहे. एअर इंडियाच्या विमानांनी वरील ठिकाणी जावयाचे असल्यास आता प्रवाशांना रोम येथे उतरावे लागेल आणि तेथून दुसऱ्या देशांच्या विमानांनी जावे लागेल. गेल्या वर्षी ब्रसेल्स शहरही प्रवाशांच्या अभावी गाळण्यात आले होते. प्रवाशांच्या संख्येत घट होण्याच्या कारणासंबंधी असा अंदाज करण्यात आला आहे की अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर मंदी आल्यामुळे हा परिणाम घडून आला असावा. मंदीमुळे युरोपला जाणाऱ्या अमेरिकन प्रवाशांची संख्या घटली आहे. युरोपमध्ये होणारी अमेरिकन भांडवलाची गुंतवणूकही कमीकमी होत चालली आहे. अर्थात युरोप–अमेरिकेच्या दरम्यान प्रवास करणाऱ्या अमेरिकन प्रवाशांची संख्या रोडावली आहे. युरोपीय देशातील कारखान्यांच्या सहकार्याने भारतात अनेक कारखाने निघत असत. परंतु अलीकडे भारत सरकारने अशा कारखान्यांना फारसे उत्तेजन दिलेले नाही. भारताने तंत्रज्ञानांच्या बाबतीत बरीच प्रगती केल्यामुळे परदेशीय तंत्रज्ञांची पहिल्या इतकी गरज लागत नाही. सहाजिकच त्यांची भारताकडे होणारी ये-जा कमी झाली.

---

## दहा वर्षांत बरीच शहरे राहण्यास अयोग्य

माणसाभोवतालच्या भौतिक परिस्थितीचा अभ्यास करणारी संयुक्त राष्ट्रसंघटनेची एक उपसंघटना आहे. सर्व जगातील भौतिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी उपसंघटनेतर्फे लवकरच प्रमुख शास्त्रज्ञांची एक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. पुढील वर्षी जूनमध्ये भरणाऱ्या संनियंत्रित परिषदेला तिला अहवाल सादर करावयाचा आहे. दरम्यान, उपसंघटनेचे सेक्रेटरी-जनरल मि. स्ट्रॉंग ह्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की पाण्याचा तुटवडा, दूषित हवा, घाण-कचऱ्याची अपुरी विल्हेवाट आणि अत्यंत दाट वस्ती ह्या कारणांमुळे येत्या १० वर्षांत जगातील कित्येक मोठी शहरे वास्तव्यास अयोग्य होतील.

## राष्ट्रीयीकृत बँकांचा कारभार

निव्वळ नफा (लक्ष रुपयात) ठेवी आणि कर्जे (कोटी रुपयात)

| | १९६८ | | १९६९ | | १९७० | | १९६८ | | १९६९ | | १९७० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बोनसपूर्वी | बोनसनंतर | बोनसपूर्वी | बोनसनंतर | बो. पूर्वी | बो. नंतर | ठेवी | कर्जे | ठेवी | कर्जे | ठेवी | कर्जे |
| अलाहाबाद | ३८ | २० | ४० | २१ | ४३ | २२ | ११३ | ७० | १२५ | ८६ | १४१ | ९६ |
| बरोडा | ९३ | ६३ | ५६ | ५६ | १४३ | ७६ | ३१४ | १९६ | ३५५ | २३४ | ४२१ | ३१० |
| इंडिया | १५० | ११७ | १६१ | १०६ | १९९ | १२६ | ३९५ | २५३ | ४३६ | २९६ | ५१३ | ३५४ |
| महाराष्ट्र | २४ | १९ | २७ | १९ | ३८ | २१ | ७३ | ५० | ८७ | ६५ | १०४ | ७२ |
| कॅनरा | ४४ | २८ | ७१ | ४० | १०३ | ४८ | १४६ | ९७ | १८५ | १२५ | २४० | १६९ |
| सेंट्रल | ११९ | ११९ | १०९ | १०९ | २०[illegible] | ७४ | ४३३ | २९६ | ५०१ | ३५८ | ५६३ | ४०१ |
| देना | ३१ | २५ | ३१ | २३ | ५१ | २६ | १२२ | ७४ | १३६ | ८६ | १५५ | ११९ |
| इंडियन | १३ | १३ | ९ | ९ | २३ | १० | ८१ | ५७ | ९० | ६५ | १०२ | ६६ |
| इंडियन ओव्हरसीज | १५ | १५ | ९ | ९ | ३७ | १६ | ९३ | ५८ | ९० | ५६ | १०८ | ६५ |
| पंजाब | १४६ | ७६ | १५९ | ७५ | २१४ | १०४ | ३५६ | २०९ | ३९१ | २२७ | ४६० | ३०३ |
| सिंडिकेट | ३१ | ३१ | २९ | २९ | ६५ | ३५ | ११२ | ७१ | १४५ | १ ५ | १६८ | १२३ |
| युनियन | ३४ | २२ | ३२ | १७ | ४९ | २७ | ११५ | ६९ | १३३ | ८६ | १७५ | ११२ |
| युनायटेड | २६ | २६ | २६ | २६ | २९ | २९ | १४४ | १०० | १६८ | ११८ | २०४ | १४२ |
| यु. कमर्शिअल | ८३ | ५४ | ८२ | ५९ | १४२ | ७६ | २४१ | १४४ | २५८ | १६३ | २५० | २०१ |
| एकूण | ८४७ | ६२८ | ८४८ | ५९८ | १३३४ | ६९० | २७४२ | ७४४ | ३०९९ | २०६९ | ३६०३ | २५२४ |

सर्व बँकांचा एकत्रित विचार केला, तर १९६७ चे मानाने १९६८ साली कर्जात ९·८% वाढ झाली; १९६८ चे मानाने १९६९ साली १८·७% वाढ झाली आणि १९६९ चे मानाने १९७० साली २२% वाढ झाली असे आढळून येते. १९७० मध्ये सर्वात ज्यास्त प्रमाणात वाढ (३४·७%) कॅनरा बँकेने दाखविली. सर्वात कमी प्रमाण (११·२%) महाराष्ट्र बँकेचे आहे.

**लूप चालू राहणार**– लूप वापरणाऱ्या स्त्रियात गर्भार राहणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण दर शेकडा २ ते ३ पडते, असे जागतिक आरोग्य संघटनेने प्रसिद्ध केले आहे. तथापि, सरकारच्या कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात लूपचा प्रसार केला जाईल. कारण, इतर कोणत्याही परंपरागत प्रतिबंधक पद्धतीपेक्षा लूप अधिक परिणामकारक आहे, असे सरकारतर्फे लोकसभेत सांगण्यात आले.

**आशियातील सर्वात मोठी गुलाबाची बाग**– लुधियाना येथे गुलाबाची बाग तयार करण्यात येत आहे, तिचा विस्तार ३५ एकर असेल. बागेत विविध जातींचे गुलाब लाविले जातील. आशियातील ही सर्वात मोठी गुलाबाची बाग होईल.

**मंत्र्यांचे ट्रंक कॉल**– २० डिसेंबर, १९७० ते ८ मार्च, १९७१ ह्या मुदतीत शेतकी खात्याचे उपमंत्री श्री. शेरसिंग ह्यांनी सर्वात जास्त म्हणजे ७३५ ट्रंक कॉल्स केले, परंतु परदेश व्यापार मंत्र्यांच्या ट्रंक कॉल्सचे बिल सर्वात जास्त म्हणजे १२,२८१ रु. झाले. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या २३० ट्रंक कॉलचे बिल १०,८६४ रु. झाले. कायदा खात्याचे उपमंत्री श्री. नित्यराजसिंह ह्यांनी फक्त एक ट्रंक कॉल केला, त्याचे बिल मात्र ४० रु. झाले.

**हत्तींची खरेदी**– मध्य प्रदेश सरकार शिकविलेले २० हत्ती केरळ राज्यातून विकत घेत आहे. प्रत्येक हत्तीची किंमत १२,००० रु. आहे. मध्य प्रदेश सरकारने जंगलांचे राष्ट्रीयीकरण केले आहे. त्यातील लाकूड वाहतुकीसाठी ह्या हत्तींचा उपयोग केला जाईल.

**बेकारांच्या संख्येत २०·८% वाढ**– उद्योगविनिमय केंद्रात नोंदलेल्या रोजगारांच्या अर्जदारांची संख्या १९७० मध्ये ७,१७,००० ने वाढून ती ४१ लक्ष, ६८ हजार झाली.

**नाव बदलले**– दि बाँबे स्टेट को. लँड मॉर्गेज बँक लि. ने आपले नाव आता बदलून दि महाराष्ट्र स्टेट को. लँड डेव्हलपमेंट बँक लि. हे नवे नाव धारण केले आहे.

**निर्वासित मुलांचे शिक्षणाची आबाळ**– १५ जुलै, १९७१ अखेर बांगला देशातून भारतात ७०,२१,००० निर्वासित आले आहेत. त्यांपैकी निर्वासित मुलांची (८ वर्षाखालील) संख्या ११,३५,००० आहे. सर्व निर्वासित लवकरच बांगला देशात परततील तेव्हा मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचा सरकारचा मानस नाही, असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे.

## जाहिरातींनी गिऱ्हाइक कितपत मिळते ?

कारखानदार, व्यापारी आणि इतर धंदेवाले आपल्या मालाची अगर आपल्याला लागणाऱ्या इतर गरजांची जाहिरात करीत असतात. ह्या जाहिरातींचा उद्देश मालाचा उठाव त्वरित आणि मोठ्या प्रमाणावर व्हावा असा असतो. भारतात अजून तरी वृत्तपत्रांतील जाहिरातींना खूपच महत्त्वाचे स्थान आहे. जनमानसापर्यंत पोचण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. नभोवाणीवरील जाहिरातींनीही अलीकडे आपली उपयुक्तता सिध्द केली आहे. पण, अशा जाहिरातींनी गिऱ्हाइकी वाढविण्याचे काम कितपत होते ह्याविषयी अधिकृत व विश्वसनीय माहिती मिळणे अवघड असते. दिल्ली येथील डायरेक्टोरेट ऑफ ऑडिओ-व्हिज्युअल पब्लिसिटीने ह्या बाबतीत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. संघटनेने ह्यासंबंधी केलेल्या अभ्यासावरून असे दिसून आले की, १,००० वाचकांनी जाहिरात पाहिली आणि वाचली तर त्यातील सरासरी ७ वाचक तिला साद देतात. संघटनेने आर्थिक विकाससंबंधीच्या एका छोट्या पुस्तिकेची ओळीने चारदा जाहिरात दिली. पुस्तिकेत शेती, ग्रामीण वीज-पुरवठा, आरोग्य आणि दळणवळण ह्या चार विषयांसंबंधी माहिती पुरविण्यात आली होती. पुस्तिकेच्या जाहिरातींना वाचकांकडून साद मिळून जी पत्रे आली त्यांची तपासणी करण्यात आली. पंचवार्षिक योजनाद्वारे झालेल्या आर्थिक विकासाची नुसती माहिती देणारे एक पत्रक पुस्तिका घेणाऱ्यांना फुकट मिळावयाचे होते.

जाहिराती सुरू झाल्यापासून पहिल्या पंधरावड्यात वाचकांकडून २४ हजार पत्रे आली. जाहिराती दिल्या गेलेल्या वृत्तपत्रांचा व मासिकांचा खप ३५ लाखांच्या आसपास होता. ज्या एका इंग्रजी वृत्तपत्रात जाहिराती प्रसिद्ध होत होत्या त्या पत्राच्या १ हजार प्रतिमागे ६·१ इतकी वाचकांची पत्रे आली. इतर भाषेतील वृत्तपत्रांचे संबधित आकडे पुढीलप्रमाणे आहेत. हिंदी: १ हजार प्रतिमागे ११ पत्रे; बंगाली : १ हजार प्रतिमागे ७·५ पत्रे; मराठी : १ हजार प्रतिमागे ५·८ पत्रे, गुजराती : १ हजार प्रतिमागे ४·५ पत्रे, कानडी : १ हजार प्रतिमागे ५·५ पत्रे आणि तामीळ : १ हजार प्रतिमागे ४·६ पत्रे. ह्या माहितीचे मूल्यमापन करताना असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला की १ हजार पत्रांमागे ७ पत्रे ही सरासरी एकंदरीने चांगली म्हटली पाहिजे. अमेरिकेत जाहिरातींचे महत्त्व खूपच मानले जाते. तेथील कारखानदार व व्यापारी 'जाहिरातबाजी' करतात, इतकेच नव्हे तर आपापल्या मालाच्या जाहिरातीत आपल्या मालाचा मोफत नमुनाही गिऱ्हाइकाला देऊ करतात. गिऱ्हाइक आकर्षित करण्यासाठी अशा अनेक युक्त्या करूनही अमेरिकेत १ हजार प्रतिमागे ३ वाचकांचा प्रतिसाद मिळाला तर तो उत्तेजक असा समजला जातो. जाहिरातींचा हेतू ह्या परिस्थितीत सफल झाला असे मानण्यात येते. १९६९ साली भारतात कुटुंबनियोजनाविषयी माहिती देणाऱ्या एका छोट्या पुस्तिकेच्या जाहिरातीला दर हजार प्रतिमागे ५ पत्रे वाचकांकडून आली.

---

## "कॅथॉलिक धर्मगुरूवर ब्रह्मचर्याची सक्ती नसावी"

"कॅथॉलिक धर्मगुरूवरील ब्रह्मचर्याची सक्ती नष्ट करून ब्रह्मचारी रहाणे वा न राहणे ही त्याच्या खुशीची बाब करावी. कॅथॉलिक धर्मगुरूंपैकी ९०% धर्मगुरूंची सक्तीच्या ब्रह्मचर्यावर निष्ठा नसते. ब्रह्मचर्याच्या सक्तीविरूद्ध ते उघड बोलत नाहीत, कारण त्यामुळे त्यांना पदच्युत केले जाईल, वैयक्तिक धिःकार होईल, अशी त्यांना भीती वाटते. ब्रह्मचर्य पाळणारा धर्मगुरूच त्याची कर्तव्ये उत्कृष्ट रीतीने पार पाडू शकेल असे माझे मत आहे. परंतु एखाद्या धर्मगुरूला कामवासना सतावू लागली, ब्रह्मचर्याची शपथ पाळणे त्याला अवघड जाऊ लागले आणि त्याला लग्नाची इच्छा झाली तर त्याची धर्मगुरूची वस्त्रे काढून घेण्यात येऊ नयेत; उलट त्याला विवाह करण्यास परवानगी देण्यात यावी. आठव्या शतकापर्यंत ब्रह्मचर्याची सक्ती नव्हती; त्याला खिस्ताची किंवा त्याच्या शिष्यांची संमती मिळाली असती असे वाटत नाही. खिस्ताच्या १२ शिष्यांपैकी फक्त एकच, सेंट जॉन, ब्रह्मचारी राहिला होता. बाकी सर्व ११ शिष्यांनी (त्यात जगाचा पहिला पोप सेंट पीटर ह्याचाही समावेश होता) विवाह केले होते. आठव्या शतकानंतरही ब्रह्मचर्याची अट फक्त लटिन चर्चमध्येच चालू होती; ओरिएंटल चर्चचे धर्मोपदेश जगभर पसरले आहेत ते आजही वैवाहिक जीवन उपभोगीत आहेत." रेव्हरंड फादर जोसेफ वदक्कन, केरळ किशक थोझिलाई पक्षाचे संस्थापक-पुढारी, ह्यांनी वरील विचार व्यक्त केले आहेत. ते स्वतः धर्मगुरू असून राजकारणात पडले आहेत; ते अविवाहित आहेत

---

## ब्रँच पोस्ट मास्तरांना ठेवींवर कमिशन मिळणार

ग्रामीण भागात अल्पबचत चळवळीस जोराची चालना देण्याच्या कार्यात ८० हजारावर ब्रँच पोस्ट मास्तर प्रत्यक्ष भाग घेणार आहेत. तीन व पाच वर्षांच्या मुदतबंद ठेवीवर ह्या पोस्ट मास्तरांना रकमेच्या एक टक्का कमिशन देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

ब्रँच पोस्ट मास्तरांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी पोस्ट-ऑफिस सेव्हिंग्ज बँकेमधील एकूण ठेवीतील वाढीवर १ टक्का कमिशन त्यांना देण्यात येईल. १९७१-७२ मधील अर्थवृद्धीवर हे कमिशन दिले जाईल.

विभाग, सर्कल व अखिल भारतीय पातळीवर सर्वात अधिक ठेवी जमा करणाऱ्या पोस्ट मास्तरांना पारितोषिके दिली जातील. विभागात उत्कृष्ट कामगिरी बजाविणाऱ्यास १०० रुपये रोख, सर्कलमध्ये २५० रुपये व अखिल भारतीय पातळीवर ५०० रुपये रोख बक्षिसे राहतील. सर्कल व अखिल भारतीय पातळीवर एक फिरती ढालही ठेवण्यात आली आहे.

---

**२५ हजारापर्यंत विनातारण कर्ज—** २५,००० रु. पर्यंतची कर्जे तारण न घेता कशी देता येतील, ह्याचा विचार चालू आहे. ह्या कर्जाची हमी घेण्यासाठी एक कॉर्पोरेशन स्थापन केली जाईल.

# हॉटेलात ५,५०० जादा खोल्या

## प्रवाशांच्या संख्येत वाढ

सन १९७० मध्ये देशाच्या विविध भागात खाजगी क्षेत्रात १७ नवे हॉटेल प्रकल्प मंजूर करण्यात आले. त्यांपैकी एका प्रकल्पासाठी हॉलिडे इन्स या अमेरिकन हॉटेल मालकांचे सहकार्य घेण्यात येत आहे. हे प्रकल्प व या आधी मंजूर केलेले ४१ प्रकल्प यामुळे हॉटेलातून आणखी ५,५०० खोल्या उपलब्ध होतील. सध्या हॉटेलातील खोल्यांची संख्या ९६५० आहे. सार्वजनिक क्षेत्रात, भारतीय पर्यटन विकास महामंडळाने "अशोक-बंगलोर" हे ८० खोल्यांचे सुसज्ज हॉटेल सुरू केले. दक्षिणेस भेट देणाऱ्या वाढत्या प्रमाणातील परदेशी प्रवाशांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी उपलब्ध करून देणारे दक्षिण भारतातील ह पहिलेच हॉटेल असेल. भारतीय पर्यटन विकास महामंडळामार्फत दिल्लीत अशोक, जनपथ, रणजित व लोधी ही हॉटेले चालविली जातात. १९७१ अखेरी दिल्लीत 'अकबर' हे आणखी एक हॉटेल सदर महामंडळामार्फत सुरू केले जाईल. डमडम विमानतळावर एक हॉटेल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

### हॉटेलासाठी कर्ज

हॉटेल उद्योगातील गुंतवणुकीच्या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या हॉटेल विकास कर्ज योजनेला १९७० मध्ये चांगली फळे दिसून आली. एकूण १,४४० खोल्या असलेल्या १४ प्रकल्पांना ६०९·५९ लक्ष रु. ची कर्जे मंजूर करण्यात आली. या योजनेखाली देण्यात आलेल्या कर्जामुळे १९६९ मध्ये कलकत्त्यातील हिंदुस्थान इंटर नॅशनल हॉटेल व १९७० मध्ये मुंबईतील हॉटेल फरियास पूण होऊ शकले. दोन्हीही हॉटेल सध्या पूर्ण क्षमतेने चालू आहेत.

### प्रवाशांच्या संख्येत वाढ

सन १९७० मध्यें भारतास भेट देणाऱ्या प्रवाशांच्याबाबतचे उद्दिष्ट २,७७,००० प्रवाशी एवढे होते. परंतु प्रत्यक्षांत त्याहून अधिक म्हणजे २,८०,८२१ प्रवाशांनी भेट दिली. १९५८ ते १९६७ या काळात प्रवाशांची संख्या ९२,००० वरून १,७९,००० पर्यन्त वाढली तर १९६८ ते १९७० या काळात प्रवाशांची संख्या १,८८,००० वरून २,८०,८२१ पर्यन्त वाढली.

सन १९७० मध्यें देशातील पर्यटकांच्या संख्येने २० लक्षांचा आकडा ओलांडला. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन इंडियन एअर लाइन्सने रिझर्व्हेशन पद्धतीत कॉम्प्युटरचा वापर सुरू केला. अहवालाच्या वर्षात इंडियन एअर लाईन्समध्ये अनेक बेकायदेशीर चळवळी झाल्या. त्यामुळे प्रवाशांच्या होणाऱ्या गैरसोयीबरोबरच महामंडळास ४·६५ कोटी रु. तोटा आला.

---

### लंडनमधील रथयात्रेचा उत्सव

जगन्नाथपुरी येथील रथयात्रेचा उत्सव म्हणजे कृष्णभक्तांची पर्वणी. खऱ्याखोट्या धर्मभावनेने बेहोष झालेल्या हिंदी भक्तांनी तो उत्सव साजरा करावा ह्यांत आश्चर्य नाही. लंडनमध्ये भरवस्तीत असा उत्सव साजरा व्हावा आणि तोही ब्रिटन अमेरिकेतील कृष्णभक्तांनी हे मात्र नवल खरे. युरोपातील कांही देशांत अलीकडे जो 'हरेकृष्ण' पंथ उदयास आला आहे त्यात अनेक कृष्णभक्त सामील झालेले आहेत. लंडनमधील ट्राफल्गार चौक झांजांच्या व टाळमृदंगाच्या घोषाने दुमदुमून गेल्याचे दृश्य ह्या प्रसंगाने तेथील नाकरिकांना पहावयास मिळाले. त्या चौकात गौरकाय गोपींनी फेर धरून नृत्यही केले. ह्या "हरेकृष्ण" पंथाची केंद्रे न्यूयॉर्क, सॅनफ्रॅन्सिस्को, परिस आणि मॉस्कोमध्येही आहेत. कृष्णभक्तीच्या साह्याने त्याच्याशी एकरुप होण्यासाठी ह्या पंथाचे अनुयायी प्रयत्नशील आहेत. पैसा, मालमत्ता, सुखाची साधने त्यांनी सोडून दिलेली आहेत. मासमच्छराला त्यांच्या आहारात स्थान नाही. लंडनमधील कृष्णभक्तांत बहुतेक ब्रिटिश आणि अमेरिकन नागरिक आहेत. त्यांच्यांतील पुरुष भक्त भगवी कफनी घालतात आणि स्त्रिया भगवी साडी वापरतात. पुरुष डोक्याचे पूर्ण वपन करतात; मात्र छोटीशी शेंडी ठेवण्यास विसरत नाहीत. लंडनमधील उत्सवाच्या मिरवणुकींत 'हरेकृष्ण' भजनाची एक ध्वनिमुद्रिका लावण्यात आली होती आणि तिच्या तालावर भक्तगण तल्लीन होऊन नाचत होते. रथयात्रेच्या समाप्तीनंतर ५० हजार लोकांना प्रसाद वाटण्यात आल्यावर सोहळा संपला.

### सफरचंदाच्या बाजाराची कोंडी

काश्मीरमध्ये फळांच्या चालू हंगामात सफरचंदांचे अमाप पीक येईल असे दिसत आहे. १९६१ सालापेक्षा ६ पटीने अधिक फळे ह्या वर्षी येतील असा अंदाज आहे. दहा वर्षापूर्वी काश्मीरमधून अवघी २५ हजार टन फळे निर्यात झाली होती. गेल्या वर्षी १ लाख टन फळे निर्यात करण्यात आली. सफरचंदाच्या व्यापारावर दिल्ली येथील घाऊक व्यापारी संघटनेची जबरदस्त पकड आहे. घाऊक व्यापाऱ्यांना मिळणारी २० किलोग्रमची पेटी ते ६० ते १०० रुपयांना विकतात. त्यांना मात्र ती २० ते ३० रुपयास मिळालेली असते. घाऊक व्यापाऱ्यांनी काश्मीरच्या बागवानांना मोठी कर्जे दिलेली आहेत. त्याच्या फेडीपोटी बागवानांना माल खुल्या बाजारात विकता येत नाही.

---

### श्री. वसंतराव वैद्यांचा परदेश दौरा

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वसंतराव वैद्य हे जपान, थायलंड, सिंगापूर आणि मलेशिया येथील पादत्राणांच्या कारखान्यांना भेट देऊन तांत्रिक ज्ञानाची प्रगती निरीक्षण्यासाठी आणि ऑर्डर्स नोंदविण्यासाठी त्या देशांकडे २५ जुलै रोजी रवाना झाले. त्यांचा दौरा दोन आठवड्यांचा आहे.

## हिंदुस्थान मशीन टूल्सचे ट्रॅक्टर्स

चंदीगडजवळच्या हिंदुस्थान मशीन टूल्सच्या ट्रॅक्टरच्या कारखान्यात अलीकडेच पहिले २०० झेटॉर जातीचे ट्रॅक्टर्स तयार झाले. ह्या कारखान्यात ८ कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आलेले आहे. उत्पादन संपूर्णपणे सुरू झाले म्हणजे दरसाल १२ हजार ट्रॅक्टर्स कारखान्यात तयार होऊ लागतील. त्यांची किंमत सुमारे ३२ कोटी रुपये असेल. कारखान्यात जास्तीत जास्त १,५०० कामगारांना रोजगार मिळेल. सध्या या कारखान्यात झेकोस्लोव्हाकिआतून आयात करण्यात आलेले सुटे भाग जुळवूनच ट्रॅक्टर तयार करण्यात येत आहेत. तथापि, येत्या तीन वर्षांत आयात भागांचे प्रमाण क्रमशः कमी करून संपूर्ण देशी बनावटीचा ट्रॅक्टर तयार होऊ लागेल. पहिल्या वर्षात २,५०० ट्रॅक्टर्स तयार करण्यात येतील.

---

## भिकाऱ्यांनाही बँकेचे कर्ज

देशांतील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर दोन वर्षांचा काळ लोटला आहे. ह्या अवधीत त्यांच्या कर्ज देण्याच्या धोरणात हळूहळू पण बराच पालट होत चालला आहे. तारणाशिवाय वैयक्तिक पतीवर कर्ज देण्याची कल्पना ह्याच धोरणातून उगम पावली आहे. ज्यांच्या उद्योगशीलतेची आणि सचोटीची खात्री आहे त्यांना मालमत्तेचे तारण नसतानाही कर्जे मिळत आहेत. पण एका राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकेने सर्वांवर कडी केली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. स्वतःची रोजगारी स्वतःच उत्पन्न करण्याच्या योजनेप्रमाणे अजमीर येथील ५ भिकाऱ्यांना कर्जे दिली आहेत. तिघा जणांना प्रत्येकी ७५० रुपये हातमाग घालण्यासाठी देण्यात आले. चौथ्याला सुतार कामाच्या दुकानासाठी ७५० रुपये आणि पाचव्याला चहाच्या दुकानासाठी ५०० रुपये देण्यात आले.

---

## समाज शिक्षण मालेच्या २५० व्या पुस्तकाचे प्रकाशन

बहुजन समाजामध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, खेड्यातील लोकांची करमणूक व्हावी व त्यांना शास्त्रीय आणि व्यावहारिक ज्ञान सोप्या भाषेत मिळावे, म्हणून 'समाज शिक्षण माला' सुरू करण्यात आलेली आहे. ही माला सुरू होऊन आता २० वर्षे होत आली आहेत. मालेच्या संपादिका डॉ. सरोजिनी बाबर, एम्. ए., पीएच्. डी. ह्या आहेत. मालेच्या २५० व्या पुस्तकाचे [आपला भारत (लेखक – कृ. भा. बाबर)] प्रकाशन, केंद्र सरकारच्या राज्यमंत्री, सौ. नंदिनी सत्पथी, यांच्या हस्ते श्री. राजारामबापू पाटील, उद्योगमंत्री, महाराष्ट्र सरकार, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ ऑगस्ट १९७१ रोजी, सायंकाळी ५-३० वाजता, शिक्षणशास्त्र संस्था, सदाशिव पेठ पुणे ३०, येथे होणार आहे.

---


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी: मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## स्वास्थ्य बिघडविणारे आवाज

### "शहर निवांत राखा" मोहिमेची आवश्यकता

प्रत्येक शहरात स्वास्थ्य बिघडविणाऱ्या आवाजाची एकसारखी भर पडत आहे. शहराची वस्ती वाढते, तसे कर्कश आवाजही वाढत जातात. दूषित हवा, दूषित पाणी, ह्याकडे लक्ष दिले जात आहे, कर्कश आवाजांच्या प्रतिबंधाकडे फारसे लक्ष दिले जात नाही.

आवाजाची तीव्रता 'बेल' ह्या मापाने मोजली जाते. अॅलेक्झंडर ग्रॅहम बेलच्या नावाने 'बेल' हे नाव देण्यात आलेले आहे. एक दशांश बेल म्हणजे डेसिबेल. ज्याला आपण स्तब्धता म्हणतो, त्यावेळी २५ डेसिबेल्स इतका आवाज असतो. १२० डेसिबेल्सच्या सुमारास आवाज तापदायक होऊ लागतो. १४० डेसिबेल्सच्या सुमारास तात्पुरते बहिरेपण प्राप्त होते.

डेसिबेल हे माप लॉगॅरिथमिक आहे. म्हणजे, ६० डेसिबेल्स आवाज हा ५० डेसिबेल्सच्या १० पट तीव्र असतो, ४० डेसिबेल्सच्या १०० पट तीव्र असतो आणि ३० डेसिबेल्सच्या १,००० पट तीव्र असतो. जेट विमान जवळून उड्डाणास निघाले, तर त्यामुळे निर्माण होणारा आवाज (१४० डेसिबेल्स) शेजारच्या उपनगरातील आवाजाच्या (५० डेसिबेल्स) एक कोटीपट तीव्र असतो. आवाजाचा मोठेपणा आणि तीव्रता ह्यात फरक आहे. उदाहरणार्थ, ५,००० वॅट रेडिओ स्टेशन सिग्नलशी ५०,००० वॅट रेडिओ स्टेशनच्या सिग्नलशी तुलना केली, तर आवाज फक्त दुप्पट मोठा असला तरी तो दहा पट तीव्र असतो!

ठराविक डेसिबलच्या पेक्षा तीव्र आवाजामुळे कायमचा बहिरेपणा येण्याची शक्यता असते. आवाज किती लांबून येतो, त्याचा प्रकार काय आहे, तो कशातून निर्माण होतो, तो वरखाली किती होतो, तो किती वेळ चालू राहतो, इत्यादींवर डेसिबेलचे दुष्परिणाम अवलंबून असतात.

तीव्र आवाजामुळे आरोग्यावर तर वाईट परिणाम होतोच पण त्याबरोबर उत्पादन, कार्यक्षमता, ह्यावरही दुष्परिणाम होतो. अल्सर, डोकेदुखी, पोटदुखी, दमा, हृदयविकार, निद्रानाश, मानसिक विकृती, हेही दुष्परिणाम घडून येऊ शकतात.

दार आपटले किंवा मूल रडू लागले की त्याच्या आवाजामुळे जो हादरा बसतो, त्याचा परिणाम रक्तदाब वाढण्यात होतो. प्राणवायूची गरज वाढते आणि त्यामुळे थकवा येतो; मानसिक समतोल बिघडतो. त्राशिकपणा, चिंता, एकाएकी डोके भडकणे ही त्यांतूनच निर्माण होतात. कचेरीतील काम आटोपून घरी येणारा मनुष्य घरातील आवाजांनी आणखीच त्रासून जातो. मुलांची आरडाओरडा, धावपळ, हसणे, रडणे, टेलिफोनची घंटा, ह्या सर्वांमुळे तो समोर दिसेल त्याच्यावर खेकसतो आणि घरातील स्वास्थ्य पार बिघडून जाते. आवाजाच्या अतिरेकामुळेच दारू, गुंगी आणणारी औषधे, झोपेच्या गोळ्या ह्यांचा अवलंब केला जातो. त्यामुळेच जगं आवाज बंद केला जातो, असेच म्हणाना!

औद्योगिक दृष्ट्या अग्रेसर असलेल्या देशांतून आवाजाचा उपद्रव सर्वात अधिक असतो, आणि त्याच्यावर नियंत्रण ठेवणे हे राष्ट्रीय धोरणाचे महत्त्वाचे अंग बनले आहे. कित्येक देशांनी इमारती बांधण्याच्या नियमात आवाजापासून बचाव करण्याची दक्षता आवश्यक केलेली आहे.

कारखाने आणि रस्ते एवढ्या पुरताच आवाजाचा प्रश्न मर्यादित नाही. घरातील आवाजही वाढत आहे, घराबाहेरून घरात येणारा आवाज खूपच वाढत चालला आहे. घरात वापरण्यात येणाऱ्या उपकरणांच्या आवाजाची त्यात भर पडते. अमेरिकन गृहिणीच्या घरात आवाज करणारी सरासरी २० उपकरणे असतात. घरातील सर्वात आवाजाची जागा म्हणजे स्वयंपाकघर. कारण तेथेच सर्व उपकरणे वापरली जातात. जुन्या डी. सी. ३ विमानाच्या कॉकपिटमध्ये जेवढा आवाज येतो तेवढा आधुनिक सैपाक घरात येत असतो! अशा परिस्थितीमधील गृहिणी थकलेली, घाबरलेली, चिडखोर न बनली तरच नवल.

"शहर स्वच्छ राखा" मोहिमेप्रमाणेच "शहर निवांत राखा" अशा मोहिमेची आता गरज निर्माण झाली आहे. सुपरसॉनिक विमानांचा वाहतुकीमुळे आवाजाचा फारच मोठा प्रश्न निर्माण केला आहे. ही विमाने आवाजापेक्षा जास्त वेगाने गतीने प्रवास करतात. समुद्रसपाटीपाशी दर ताशी ७४० मैल वेगाने—आणि त्याने जो हादरा बसतो, त्याने सर्वजण खिळखिळे होऊन जातात.

---

## जिराइत शेतीविषयक संशोधनाचे महत्त्व

पब्लिक अकौंटस् कमिटीने आपला ४था अहवाल लोकसभेला सादर केला आहे. ह्या अहवालात जिराइत शेतीसंबंधी विचार व्यक्त करण्यात आले आहेत. देशांतील ८० टक्के शेतजमीन अजूनही जिराइत म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. म्हणून जिराइत शेती कसण्याच्या तंत्रात सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला पाहिजे असा अभिप्राय अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. जिराइत शेतीच्या तंत्राविषयी संशोधन करण्यात आले पाहिजे असे सांगून अहवाल पुढे म्हणतो की, ह्या प्रकारच्या शेतीचे तंत्र सुधारण्यात आले तर अन्नधान्याच्या उत्पादनात बरीच वाढ करता येईल. त्यासाठी जिराइत शेतीच्या परिस्थितीत वापरता येईल अशा प्रकारच्या धान्याच्या नव्या जाती शोधून काढण्यात आल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे संशोधनाअंती हाती आलेली माहिती शेतकऱ्यापर्यंत पोचविण्याचीही व्यवस्था झाली पाहिजे. जिराइत शेतीच्या तंत्राचे शिक्षण शेतकऱ्यांना देण्यासाठी योग्य ती यंत्रणा आहे की नाही ह्याची शहानिशा सरकारने केली पाहिजे आणि नसेल तर ती नव्याने उभारली पाहिजे. तांदुळाच्या सुधारलेल्या जाती हुडकून काढण्यास यश आले आहे. परंतु जास्त पीक देणाऱ्या ह्या जातींची लागवड करून उत्पादन वाढविण्यात आलेले यश मर्यादित आहे. भारतात दर हेक्टरमागे तांदुळाचे उत्पादन अवघे १,५५० किलोग्रॅम आहे, तर जपानमध्ये ते ५,७५० किलोग्रॅम इतके आहे.

# विविध माहिती

**स्कूटरची मार्गप्रतीक्षा** — बजाज १५० आणि लॅम्ब्रेटा स्कूटर्ससाठी ३१ मार्च, १९७१ अखेर अनुक्रमे २,३८,४८९ आणि १,०३,६२५ ऑर्डरींची नोंद झालेली आहे. राजदूतसाठी २१,००० ऑर्डरी वाट पाहात आहेत. फॅटॅब्युलससाठी रांग लागलेली नाही. बजाज् १५० मिळण्यासाठी ९ ते १० वर्ष, लॅम्ब्रेटासाठी ९ ते १० वर्ष आणि राजदूतसाठी २ ते ३ वर्ष अर्जदारांना थांबावे लागते. जून, १९७१ मध्ये ३,२५० बजाज १५०चे, २,३४० लॅम्ब्रेटाचे आणि २५० राजदूतचे उत्पादन झाले.


**बँकेची १५ लक्ष रु. ची फसवणूक** — पद्मसी मुरारजी दंड आणि हिरजी वालजी शहा ह्या 'एच. पी. ब्रदर्स" फर्मच्या भागीदारांना एका बँकेला १५,१६,०७१ रुपयांना फसविल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. ओव्हरड्राफ्टची आणि परदेशी व अंतर्गत हुंड्या डिस्कौंट करण्याची त्यांनी बँक ऑफ टोकियोकडे व्यवस्था केलेले होती. आपण पैशाच्या अडचणीत आल्यामुळे ११ परदेशी व ३४ अंतर्गत अशा ४५ बनावट हुंड्या बँकेकडून डिस्कौन्ट करून घेऊन १५,१६,०७१ रु. घेतले असे त्यांनी बँकेला १९६८ मध्ये कळविले. ऑगस्ट १९६९ मध्ये बँकेने त्यांचेवर ६३,२७,७७९ रु. वसुलीचा हुकूमनामा मिळविला. हे एकूण देणे आरोपी देऊ शकले नाहीत आणि मे, १९७० मध्ये त्यांना दिवाळखोर ठरविण्यात आले.

**सी. व्ही. रामन पोस्टाचे तिकीट** — नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सी. व्ही. रामन ह्यांच्या प्रथम श्राद्धदिनी (२१ नोव्हेंबर) पोस्ट खाते खास तिकीट काढणार आहे.

**कुमारी नग्न विश्वसुंदरी** — मिसेस हेस ह्या एका कर्मचारी स्त्रीची हॅमिल्टन (ऑंटेरिओ) येथे १९७१ ची कुमारी नग्न विश्वसुंदरी म्हणून निवड झाली. १७ स्पर्धकांत ह्या २५ वर्षांच्या विवाहित स्त्रीने पहिला नंबर पटकविला. त्या वेळी तिने पायात पांढरे शूज आणि गळ्यात सोन्याची साखळी, असा 'पोशाक' केला होता. १४ परीक्षकांत दोन स्त्रियांचा समावेश होता.

**वैकुंठभाई मेहतांच्या चारित्राचे प्रकाशन** — महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीचे ध्येयनिष्ठ व कार्यक्षम नेते श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांच्या श्री. रोहित दवे ह्यांनी लिहिलेल्या इंग्रजी भाषेतील चरित्राचे प्रकाशन मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक ह्यांनी २६ जुलै रोजी केले. पुस्तकाचे हिंदी, मराठी, गुजराती आणि तामिळ भाषांतर केले जाणार आहे.

**मेघालय राज्याची स्थापना** — आसाम राज्यात स्वायत्त राज्य म्हणून मेघालयाची स्थापना एप्रिल, १९७० मध्ये केली होती. आता त्याला इतर राज्यांप्रमाणेच दर्जा २ ऑक्टोबर रोजी मिळणार आहे.


**GADRE BROTHERS**
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone: 318 Gram: 'SEWA
Sangli Madhavnagar




- LESS FUEL CONSUMPTION
- GETS HEATED EQUALLY FROM ALL SIDES
- LIGHT WEIGHT
- NON RUSTABLE
- RETURN VALUE 35% LESS.

Mfgd. by
VARSHA INDUSTRIES
64/23, ERANDWANA, LAW COLLEGE RD POONA 4
PHONE: 55435




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)